बेकायदा होर्डिंगविरोधात कारवाई करा

आदेशाचे पालन करण्याची पालिकांना हायकोर्टाची तंबी

मुंबई । प्रतिनिधी

राज्यभरातील बेकायदेशीर फलकबाजी विरोधात कारवाईचे आदेश देऊनही कारवाई करण्यास टाळटाळ करणाऱ्या आणि कारवाई अहवाल सादर न करणाऱ्या पालिकांच्या कारभारावर उच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली. मुख्य न्यायमूर्ती मुख्य न्यायमूर्ती मुख्य न्यायमूर्ती आलोक आराध आणि न्यायमूर्ती उमकरंद कर्णिक यांच्या खंडपीठाने कारवाईचा बडगा उगारा अन्यथा तुम्हालाच कारवाईला सामोरे जावे लागेल. ही शेवटची संधी देतो. चार आठवड्या भूमिका स्पष्ट करा, असे निर्देश देत याचिकेची सुनावणी जून महिन्यात निश्चित केली.

राज्यभर राजकीय पक्षांनी लावलेल्या बेकायदेशीर बॅनर, होर्डिंग्ज आणि पोस्टर्सच्या मुद्द्यावर दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकांवर सहा वर्षापूर्वी जानेवारी २०१७ मध्ये याचिकेवर सुनावणी झाल्यानंतर न्यायमूर्ती अभय ओक आणि न्यायमूर्ती ए.ए. सय्यद यांच्या खंडपीठाने निर्णय देताना बेकायदा होर्डिंग, बॅनरविरोधात कारवाई करावी, नागरिकांना तक्रार करता यावी यासाठी यंत्रणा निर्माण करावी याबाबत सविस्तर आदेश दिलेत. असे असतानाही गेल्या सहा वर्षात या आदेशाची अंमलबजावणी होत नसल्याने हायकोर्टाने स्वतःहून अवमान याचिका दाखल करून घेतली आहे. तर बेकायदा होर्डिंग्जमुळे शहरांचे विद्रुपीकरण झाल्याचा मुद्दावर सातार्यातील सुस्वराज फाउंडेशनतसेच अन्य याचिकाकर्त्यांच्यावतीने ॲड. उदय वारुंजीकर, ॲड. मनोज कोंडेकर, ॲड. मनोज शिरसाट यांच्यामार्फत जनहित याचिका केल्या आहेत.

या याचिकांवर मुख्य न्यायमूर्ती आलोक आराध आणि न्यायमूर्ती मकरंद कर्णिक यांच्या समोर सुनावणी झाली. मागिल सुनावणीच्यावळी खंडपीठाने बेकायदा होर्डिंग आणि बॅनरबाजी विरोधात आदेशानुसार काय कारवाई केलीत?, याचा अहवाल सादर करण्याचे निर्देश राज्य सरकारसह राज्यातील सर्वच महापालिका व नगरपालिकांना दिले होते.मात्र पालीकांनी अहवाल सादर न केल्याने खंडपीठाने संताप व्यक्त केला. कारवाईचा बडगा उगारा आणि चार आठवड्यात अहवाल सादर करा . अन्यथा अवमाना कारवाईला सामोर जा अशी तंबींच दिली.

आयुर्वेदात मेडिक्लेम देणारे पहिले हॉस्पिटल नाशिककरांसाठी वरदान : गुरुमाऊली

डॉ. हासे हॉस्पिटल रुग्णसेवेत

नाशिक । केरळ राज्यात मिळणारे अत्याधुनिक आयुर्वेदिक उपचार नाशिकमध्ये उपलब्ध करून आयुर्वेदात कॅशलेस मेडिक्लेम देणारे नाशिक मधील पहिले डॉ. हासे हॉस्पिटल व मॅटर्निटी होम खऱ्या अर्थाने सर्व सामान्यांसाठी वरदान ठरणार असल्याचा विश्वास गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांनी व्यक्त केला.

अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर (दि. ३०) डॉ. संदीप हासे आणि डॉ. प्राजक्ता हासे यांच्या डॉ. हासे हॉस्पिटल आणि मॅटर्निटी होमचे उद्घाटन पार पडले यावेळी अण्णासाहेब मोरे बोलत होते. कार्यक्रमास आमदार सीमा हिरे , देवयानी फरांदे , शिवसेनेचे उपनेते सुधाकर बडगुजर, डॉ. अनिरुद्ध धर्माधिकारी, मनसे सरचिटणिस दिनकर पाटील, माजी खासदार हेमंत गोडसे, शिवसेना जिल्हा प्रमुख डी. जी. सूर्यवंशी, निमा महाराष्ट्र अध्यक्ष डॉ. तुषार सूर्यवंशी, माजी नगरसेवक सुवर्णा मटाले, हर्षा गायकर, भागवत आरोटे, प्रतिभा पवार, मधुकर जाधव, डॉ. वैभव महाले आदी मान्यवर

उपस्थित होते. हॉस्पिटलमध्ये आधुनिक आणि सुशासित ऑपरेशन थिएटर, इन्फर्टिलिटी उपचार सुविधा आणि मेडिक्लेमची सोय उपलब्ध आहे.

पान १ वरून...

जीएसटी संकलन २.३७ लाख कोटी

ला नवी करप्रणाली लागू झाल्यानंतरचे हे दुसरे सर्वाधिक जीएसटी संकलन होते. या वर्षी एप्रिल महिन्यात देशांतर्गत व्यवहारांतून जीएसटी संकलन १०.०७ टक्क्यांनी वाढून ते १.९ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे. आयात वस्तूंवरील कर २०.८ टक्क्यांनी वाढून तो ४६,९१३ कोटी रुपये झाला आहे. एप्रिलमध्ये जारी केलेल्या पत्ताव्यवच्या रकमेत ४८.३ टक्क्यांनी वाढ होऊन ती २७,३४१ कोटी रुपये झाली आहे.

चालू वर्षी मार्चमध्ये जीएसटी संकलन गेल्या वर्षीच्या याच महिन्याच्या तुलनेत ९.९ टक्क्यांनी वाढून १.९६ लाख कोटी रुपये झाले. यावर्षी फेब्रुवारीत नोंदवलेल्या १.८४ लाख कोटी रुपयांच्या कर संकलनापेक्षा टप्प्याटप्प्याने जीएसटी संकलन ६.८ टक्क्यांनी जास्त होते. मार्चमध्ये एकूण जीएसटी महसुलात सीजीएसटी (केंद्रीय जीएसटी) तून ३८,१०० कोटी, राज्य जीएसटीतून ४९,९०० कोटी, एकात्मिक जीएसटीतून ९५,९००कोटी रुपये तर भरपाई उपकरातून १२,३०० कोटी रुपये समाविष्ट होते.

लाडक्या बहिणींसाठी दोन खात्यांच्या निधी

रुपये उपलब्ध करून दिले आहेत. यापैकी ४१० कोटी ३० लाख रुपयांचा निधी महिला आणि बालविकास विभागाला देण्यात आला आहे. आदिवासी विकास खात्याला देण्यात आलेल्या ३ हजार ४२० कोटी रुपयांच्या सहाय्यक अनुदानातून ३३५ कोटी ७० लाख रुपयांचा निधी लाडकी बहीण योजनेसाठी वळविण्यात आला आहे. या दोन्ही खात्यातून प्रत्येक महिन्याला निधी वळता केला जाणार आहे. सरकारच्या या निर्णयाबाबत प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट आणि आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, दोघांकडून कोणताही प्रतिसाद मिळू शकला नाही.

शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन कोणाचे?

आहे. अशावेळी आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कोल्हापुरात शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत हात झटकले. त्यामुळे शेतकरी कर्जमाफीचा मुद्दा पुन्हा तापण्याची शक्यता आहे.

अजित पवार यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत बचावात्मक पवित्रा घेतल्याने त्यांच्या वक्तव्यावरून शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण होण्याची शक्यता आहे. अजित पवार यांनी 'लाडकी बहीण' योजनेच्या हप्त्यांबाबतही भाष्य केले. आदिती तटकरे यांनी सांगितल्यानंतर लाडक्या बहिणी योजनेचे आम्ही नियोजन केले आहे. सर्व योजनांचे पैसे देण्याचा प्रयत्न करीत आहोत, असेही पवार म्हणाले.

पालकमंत्रीपदावरून काही अडले का?

रायगडच्या पालकमंत्रीपदाबाबती अजित पवार बोलले. रायगडला पालकमंत्रीपद दिले नाही म्हणून काही अडले आहे का? असा सवाल पवार यांनी केला. सर्व कामे होत आहेत. कोण काय बोलले याबद्दल मला विचारू नका, असे म्हणत त्यांनी खासदार संजय राऊत यांच्या वक्तव्यावर बोलण्यास नकार दिला.

बच्चू कडूंची आंदोलन घोषणा

कर्जमाफीच्या मुद्दावर 'प्रहार'चे अध्यक्ष बच्चू कडू यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. कडू यांनी पुढील महिन्यापासून 'डीसीएम टू सीएम' असे आंदोलन करण्याची घोषणा केली आहे. या आंदोलनात बच्चू कडू २ जूनला बारामतीत अजित पवारांच्या घरासमोर 'अर्थसंकल्प वाचन आंदोलन'करून त्यांना कर्जमाफीची आठवण करून देणार आहेत. आंदोलनाचा शेवट नागपूरमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या घरासमोर आंदोलन करून केला जाणार आहे.०

अनेकांची झोप उडणार

जमलेल्या उपस्थितांना मोदींनी संबोधित केले. तीन वर्षांपूर्वी सप्टेंबर महिन्यात आदि शंकराचार्य यांच्या वंदनीय जन्मस्थानाला भेट देण्याचा सन्मान प्राप्त झाल्याची आठवण सांगितली. काशी या आपल्या लोकसभा मतदारसंघात आदि शंकराचार्य यांचा भव्य पुतळा उभारण्यात आल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. हा पुतळा म्हणजे आदि शंकराचार्य यांची प्रचंड आध्यात्मिक विद्वत्ता आणि शिकवण यांच्याप्रती आदरांजली प्रतीक आहे, असे त्यांनी आवर्जून सांगितले. मूळचे केरळचे असलेल्या आदि शंकराचार्य यांनी देशाच्या विविध कानाकोपऱ्यात मठांची स्थापना करून राष्ट्रीय चैतन्याची जागीव जागृत केली, असे मोदी म्हणाले.

विझिंजम खोल पाण्यातील सागरी बंदर आता नव्या युगाच्या विकासाचे प्रतीक म्हणून उदयास आले आहे. हे बंदर ८,८०० कोटी खर्चून विकसित करण्यात आले आहे. सागरी मालवाहतूक केंद्राची क्षमता येत्या काही वर्षांत तिप्पट होईल. त्यामुळे जगातील काही मोठी मालवाहू जहाजेही या बंदरातून सुरळीतपणे ये-जा करू शकतील, असेही मोदींनी स्पष्ट केले.

आठ हजार कोटींचे करार

सोबत ३ हजार कोटी रुपयांचा तसेच गोदरेज सोबत दोन हजार कोटी रुपयांचा सामंजस्य करार करण्यात आला.

जगातील दोन सर्वोत्तम विद्यापीठांसोबत सामंजस्य करार होत आहे. नवी मुंबईत सुरू होत असलेल्या 'एन्यू सिटी'त जगभरातील सर्वोत्तम विद्यापीठे एकाच ठिकाणी येतील. त्यामुळे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या विद्यापीठांत शिकण्याचे येथील युवकांचे स्वप्न प्रत्यक्षात येणार आहे, असे फडणवीस म्हणाले. जगभरात भारतीय चित्रपटसृष्टी आणि कला यांची मोठी लोकप्रियता आहे. आपल्याला सर्वोत्तम व्हायचे आहे. नवीन तंत्रज्ञान आत्मसात करायचे आहे आणि आपल्या प्रतिभावान तंत्रज्ञांच्या कौशल्यातून नवनिर्मिती करायची आहे, असे सांगून फडणवीस म्हणाले, प्राईम फोकस आणि गोदरेज यांच्यासोबतच करारामुळे आपले उद्दिष्ट पूर्ण होईल. विश्वास, गुणवत्ता आणि विश्वासार्हतेसाठी ओळखल्या जाणाऱ्या निवडक कंपन्यांमध्ये 'गोदरेज'चे नाव अग्रगण्य आहे. गोदरेजकडून उभारला जाणारा स्टुडिओ सर्वोत्तम ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. करार झालेल्या सर्व संस्थांना राज्य सरकारच्यावतीने आवश्यक ते सर्व सहकार्य केले जाईल, असे आश्वासनही फडणवीस यांनी दिले.

'निफ्टी वेव्हज् इंडेक्स'चा आरंभ

'एनएसई इंडायसेस लिमिटेड'ने या परिषदेत मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते व्हर्युअल बेल वाजवून 'निफ्टी वेव्हज् इंडेक्स'चा आरंभ केला. 'निफ्टी वेव्हज् इंडेक्स'च्या माध्यमातून या कंपन्यांमध्ये जगभरातील गुंतवणूक होईल. निफ्टी वेव्हज् इंडेक्समध्ये मीडिया, मनोरंजन आणि गेमिंग क्षेत्रातील ४३ सूचीबद्ध कंपन्या समाविष्ट आहेत.

दोन युनिव्हर्सिटींशी 'सिडको'चा करार

सिडकोमार्फत नवी मुंबई येथे एज्युसिटी प्रकल्पाची उभारणी करण्यात येणार आहे. या प्रकल्पामध्ये युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडमधील युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क यांचे कॅंपस स्थापन करण्याच्या उद्देशाने दोन्ही संस्थांशी स्वतंत्रपणे प्रत्येकी १ हजार ५०० कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले आहेत.

'प्राईम फोकस' आणि 'गोदरेज'सोबत करार

उद्योगविभाग आणि 'प्राईम फोकस' तसेच 'गोदरेज फंड मॅनेजमेंट ॲंड इन्व्हेस्टमेंट डव्हायझर्स प्रायव्हेट लिमिटेड' या कंपन्यांशी स्वतंत्रपणे सामंजस्य करार करण्यात आले. 'प्राईम फोकस' सोबत जागतिक दर्जाच्या स्टुडिओची इकोसिस्टिम तयार करण्याच्या दृष्टीने करार करण्यात आला असून यामध्ये प्रस्तावित गुंतवणूक ३ हजार कोटी रुपये असणार आहे. या माध्यमातून सुमारे २ हजार ५०० लोकांना थेट रोजगार उपलब्ध होईल. हा प्रकल्प २०२५-२६ मध्ये सुरू होईल. 'गोदरेज'सोबत पनवेल येथे एज स्टुडिओ स्थापन करण्याबाबत करार झाला. या कराराचा पहिला टप्पा ५०० कोटी रुपये गुंतवणुकीचा असून याद्वारे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष ६०० रोजगार निर्मिती होईल. हा प्रकल्प २०२७ मध्ये सुरू होईल.

महिला आणि बालविकास विभाग सर्वोत्तम

राज्य सरकारच्या या मोहिमेचे मूल्यांकन करण्यात आले. संकेतस्थळ कार्यक्षमता, कार्यालयीन सोयीसुविधा, तक्रार निवारण व्यवस्था, गुंतवणूक अनुकूलता, नागरिकांसाठी सेवा सुलभता, तंत्रज्ञान वापर अशा १० निकषांवर आधारित मूल्यमापन करण्यात आले.

ही मोहीम केवळ व्यवस्थापन नाही तर उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि लोकहितासाठी कार्यक्षम प्रशासनाचे प्रतिबिंब आहे. उत्कृष्ट अधिकाऱ्यांनी इतरांसमोर आदर्श निर्माण केला आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. राज्य सरकारच्या सर्व ४८ विभागांनी १०० दिवसांचा धोरणात्मक बाबींचा कार्यक्रम हाती घेऊन महत्त्वाची नवीन धोरणे, जूरगामी निर्णय आणि लोकाभिमुख उपक्रमांची आखणी सुरू केली. गेल्या १०० दिवसांत या सर्व विभागांनी निश्चित केलेल्या ९०२ धोरणात्मक उद्दिष्टांपैकी ७०६ उद्दिष्टे (७८ टक्के) पूर्णतः साध्य केली आहेत. तर उर्वरित १९६ उद्दिष्टे पूर्ण होईपर्यंत संबंधित विभाग आपले काम चालूच ठेवतील. एकूण ४८ विभागांपैकी १२ विभागांनी आपली १०० टक्के उद्दिष्ट पूर्तता केली आहे. तर आणखी १८ विभागांनी ८० टक्क्यांपेक्षा जास्त उद्दिष्टे साध्य केली आहेत.

पतंजली भारुवा सोल्युशन्सची नवी बँकिंग प्रणाली

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

पतंजली समूहाची तंत्रज्ञान शाखा, भारुवा सोल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेड (बीएसपीएल) ने एआय-संचालित, बहुभाषिक (द्विभाषिक) ३६०ओ बँकिंग ईआरपी सिस्टम या प्रणालीचे नुकतेच अनावरण करण्यात आले.

प्रादेशिक, सहकारी आणि छोट्या वित्तीय संस्थांना सर्वसमावेशक आणि अनुपालन तंत्रज्ञानासह सक्षम करून डिजिटल बँकिंगमध्ये क्रांती घडवून आणण्यासाठी हे व्यासपीठ तयार करण्यात आले आहे.

पतंजली समूहाचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक आचार्य बालकृष्ण यांनी तांत्रिक समावेशासाठी भूमिका व्यक्त केली. ते म्हणाले, भारत हे अनेक भाषांचे राष्ट्र आहे. भारुवा सोल्यूशन्स एक परिवर्तनकारी उत्पादनाचे अनावरण करत आहे जे कार्यात्मकदृष्ट्या व्यापक आणि भाषिकदृष्ट्या समावेशक आहे. एआय आणि मशीन लर्निंगच्या या युगात, आपल्या ग्रामीण, अर्ध-शहरी, सहकारी आणि लघु वित्त संस्थांना सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रातील बँकांप्रमाणेच तंत्रज्ञानाची उपलब्धता मिळण्याची वेळ आली आहे. हा उपक्रम भारताला प्रत्येक अर्थाने सक्षम बनवण्याबद्दल आहे. भारुवा सोल्युशन्सने नॅचरल सपोर्ट कन्सल्टन्सी सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडसोबत भागिदारी केली आहे. ही कंपनी द्विभाषिक बँकिंग क्षेत्रातील अनुभवी आहे आणि १९९९ पासून एएमएल, एलओएस, एमआयएस इत्यादी सराउंड उत्पादनांसाठी ५,००० हून अधिक बँक शाखा स्वयंचलित करण्याचा वारसा असल्याचेही आचार्य म्हणाले.

१३३ शिक्षक 'मेंटॉर इन कोचिंग'

नाशिक । येथील नाशिक जिल्हा कोचिंग क्लासेस संचालक संघटना पीसीसीडीए आणि शहरातील नामवंत तोतलेज् कॉमर्स अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने, उद्या (दि. ४) सकाळी १० वाजता, मुंबई नाका येथील हॉटेल कृष्णलीला येथे शहर व जिल्ह्यातील दहावीपर्यंत क्लासेस घेणाऱ्या जवळपास १३३ शिक्षकांना यंदाचा 'आयकॉनिक मेंटॉर इन कोचिंग'हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. संघटनेचे अध्यक्ष जयंत मुळे व टीसीएचे संचालक सीए समीर तोतले यांनी ही माहिती दिली.

स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ देऊन या शिक्षकांचा गौरव होईल. यामध्ये रुपेश शिरसाठ, विद्या मुंढे, भाग्यश्री दराडे, दिनकर नेहे, आरती खाबिया-जैन, नीलेश सावंत, खोलम, नीलेश देवरे, दीपक शिवले, स्वप्नील कदम, पवन जोशी, अण्णासाहेब नरुटे, स्नेहा प्रवीण निकम, रविंद्र वाघ, संतोष बच्छाव, मयूर जाधव, तेजस बुचके, राहुल नागरे, घनश्याम अहिरे, किशोर सपकाळे आदींसह इतर शिक्षकांचा समावेश आहे. नागरिकांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

व्यावसायिक गॅस सिलिंडर स्वस्त

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

मे महिन्याच्या आरंभी व्यावसायिक वापराच्या एलपीजी गॅस सिलिंडरचे दर सिलिंडरमागे १४.५० रूपयांनी कमी झाले आहेत. मात्र घरगुती सिलिंडरचे दर 'जैसे थे' असेच असणार आहेत. गेल्या काही दिवसांपासून महागाईने डोके वर काढल्याने सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत. गेल्या दहा वर्षांत गॅस सिलिंडरच्या किंमती दुप्पट झाल्याने ग्राहकांत नाराजीचा सूर उमटत आहे. मात्र चालू महिन्याच्या आरंभी व्यावसायिक वापरातील एलपीजी गॅसच्या किंमती कमी झाल्याने ग्राहकांना आता हॉटेलिंगचा आनंद घेता येईल. सलग दुसऱ्यांदा व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या किंमतीत कपात झाली आहे.

'किम्स मानवता'मध्ये रोबोटिक जॉइंट रिप्लेसमेंट सेंटर रुग्णसेवेत

नाशिक । शहरात नव्याने रुग्णसेवेत दाखल होत असलेल्या किम्स मानवता हॉस्पिटल येथे रोबोटिक जॉईंट रिप्लेसमेंट सेंटरचे उद्घाटन आयुष राज्यमंत्री व आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया आता नव्या युगाकडे वाटचाल करत आहे. शस्त्रक्रियेतील साहित्य, उपकरणे आणि तंत्रांमध्ये बऱ्याच सुधारणांमुळे या प्रक्रियेची परिणामकारकता खूप वाढली आहे. अचूक इम्प्लांट पोझिशनिंग आणि अलाइनमेंटच्या आव्हानांवर मात करण्यासाठी, नाविन्यपूर्णतेची सतत गरज भासत असते. संगणकाच्या सहाय्याने शस्त्रक्रिया नवोपक्रमाचा एक नवीन टप्पा सुरू केला आहे आणि जर आपण अलीकडील ट्रेंड आणि प्रगती तंत्रज्ञानाबद्दल बोलायचे झाल्यास , रोबोटिक्सने वर्तमान आणि भविष्यासाठी नवा मार्ग दाखवला आहे. गुडघा बदलण्याच्या शस्त्रक्रियांसाठी जगातील पहिला स्वायत्त रोबोट आहे. किम्स मानवता रुग्णांसाठी सर्वोत्तम शस्त्रक्रिया परिणाम देण्यासाठी सज्ज झाले आहे. या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने परिणामकारक उपचार आता रुग्णांवर होणार आहे अशी माहिती किम्स मानवता हॉस्पिटलच अध्यक्ष डॉ. राज नगरकर यांनी दिली.

रोबोटिक शस्त्रक्रियेमुळे चांगले इम्प्लांट पोझिशनिंग, अचूक शस्त्रक्रिया हाड कापणे, कमीत कमी मानवी हस्तक्षेप, जलद पुनर्प्राप्ती आणि लवकर डिस्चार्ज असे बरेच फायदे असल्याची माहिती सांधे विकार व सांधे बदल शस्त्रक्रियातज्ज्ञ डॉ. स्पंदन कोशिरे यांनी दिली. यावेळी ऑर्थोपेडिक विभागाचे सांधे विकार व सांधेरोपण शस्त्रक्रियातज्ज्ञ डॉ. मयूर पेखळे, डॉ. प्रणित सोनवणे उपस्थित होते. सीओओ डॉ. निलेश सिंग यांनी आभार मानले.

टोयोटा इनोव्हा हायक्रॉसची नवी श्रेणी

नाशिक । टोयोटा किर्लोस्कर मोटर अर्थात टीकेएमने नुकतीच इनोव्हा हायक्रॉसच्या झेडएक्स(ओ) कारच्या नव्या श्रेणीचे अनावरण केले. इनोव्हा हायक्रॉसच्या उल्लेखनीय यशानंतर नव्या श्रेणीच्या कारमध्ये अनेक अत्याधुनिक वैशिष्ट्यांसह फिचर सादर करण्यात आले आहे.

आकर्षक स्टाईल व उत्कृष्ट कार्यक्षमतेने ही कार ग्राहकांना आकर्षित करत असल्याचे व्हाईस प्रेसिडेंट वरिंदर वाधवा यांनी सांगितले. ग्राहकांच्या बदलत्या अपेक्षांना पूर्ण करण्यासाठी डिझाईन करण्यात आलेली हायक्रॉसमध्ये पावर्ड ओट्टोमन सेकंड रो सीट्स, फ्रंट व्हेंटिलेटेड सीट्स, ड्युअल झोन एअर कंडिशनिंग, पॅनोरामिक सनरूफ, सेफ्टी सेन्स अशी अनेक वैशिष्ट्ये आहेत.

आजचे कार्यक्रम

भूमिका नाटक
रात्री ९: ३० वा. कालिदास कलामंदिर

अंजु उडाली भुर्रर्र नाटक
साय. ५: ३० वा. कालिदास कलामंदिर

भारतीय संस्कृती जोपासा : वालावलकर

नाशिकरोड वसंत व्याख्यानमालेला उत्साहात प्रारंभ

नाशिकरोड । प्रतिनिधी

आज सोशल मीडिया आणि यांत्रिक युगात लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांचा एकटेपणा वाढत चालला आहे. संवाद खुंटला आहे. सामाजिक मूल्य, संस्कृती लयास चालली आहे. भारतीय संस्कृती जपत माणुसकी, प्रेमांचे बंध कायम ठेवत जगणे सुंदरतेने जगण्यासाठी बदल स्वतःपासून करा, हा बदल समाजाला जगवणारा, पुढील पिढीला घडवणारा हवा, असे प्रतिपादन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधीक्षक शर्मिष्ठा वालावलकर यांनी केले.

नाशिकरोड देवळाली व्यापारी बँकेतर्फे मुक्तिधाम मागील शाळा क्रमांक १२५ च्या मैदानावर वसंत व्याख्यानमालेला उत्साहात प्रारंभ झाला या व्याख्यानमालेच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्रशांत भुतडा हे होते. वालावरकर यांचे बदलते सामाजिक भान यावर व्याख्यान झाले. व्याख्यानमालेचे हे ४० वे वर्ष असून दररोज उपस्थित राहणाऱ्या

नागरिकांमधून लकी ड्रॉ काढून बक्षिसे देण्यात येत आहे. वालावलकर म्हणाल्या की, मोबाईल बाजूला ठेवत आपण व्यक्त झालो पाहिजे. सोशल मीडिया हा आरसा असून आपण कोठे चाललो हे त्यातून कळते. मात्र, त्याच्या गैरवापरामुळे व्याभीचार, अनागोंदी वाढत चालली आहे. मूल्य, संस्कृती राहिलेली नाही. चांगला माणूस बनणे विसरत चाललोय. अशा समाजाच्या दुरुस्तीसाठी आपणच पुढे आले पाहिजे. सध्याचे पालकत्व अवघड झाले आहे. आपण मोबाईलचे गुलाम झाला आहोत. आपल्या चुकीच्या वागण्यामुळे मुले बिघडत चालली आहेत. ही दुरुस्ती आपणच लवकरात लवकर केली पाहिजे. आपण आतून आनंदी नसेल तर प्रगतीला काहीचा किमत नाही हे मुलांना सांगा. प्रिवेडींग, चार-चार दिवस विवाह सोहळे, जातीनिहाय व्हॉटसॲप ग्रुप अशा गोष्टी टाळल्या पाहिजे. भारतीय समाजाइतकी सुंदर मूल्यव्यवस्था दुसरी नाही. ती जोपासली पाहिजे.

यावेळी बँकेचे अध्यक्ष दत्ता गायकवाड, निवृत्ती अरिंगळे, अरुण जाधव, अशोक चोरडिया, मनोहर कोरडे, सुधाकर जाधव, योगेश नागरे, नितीन खोले, श्रीराम गायकवाड, दिनकर आढाव आदी संचालक तसेच कर्मचारी प्रतिनिधी संजय पागेरे व नागरिक उपस्थित होते.